
लोकमत

# लंगरे यांच्या गांधीजींवरील संदर्भग्रंथाचे आज प्रकाशन

## अमेरिकेतील विद्यापीठाचा पुढाकार

कोल्हापूर : व्हर्जिनिया (अमेरिका) येथील जेम्स मॅडिसन विद्यापीठातील दिवंगत प्रा. टेरी बेट्‌झल आणि येथील शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील प्रा. चंद्रकांत लंगरे यांनी महात्मा गांधी यांच्या जीवन व कार्याविषयी संपादित केलेल्या दोन महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय संदर्भग्रंथांचे प्रकाशन आज, शुक्रवारी गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला ऑनलाईन करण्यात येणार आहे.

अमेरिकेतील प्रमाणवेळेनुसार सकाळी नऊ वाजता, तर भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी साडेसहा वाजता हा कार्यक्रम होईल. इंग्लंड पार्लमेंटमधील मजूर पक्षाचे सदस्य प्रा. लॉर्ड भिकू पारेख आणि महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांची या




कार्यक्रमास विशेष उपस्थिती असेल.

प्रा. बेट्‌झल आणि प्रा. लंगरे यांनी 'इंडो-अमेरिकन बुक प्रोजेक्ट २०१९'अंतर्गत महात्मा गांधी यांच्याविषयीच्या ग्रंथांचा प्रकल्प हाती घेतला. त्यातून 'रिफ्लेक्शन्स ऑन महात्मा गांधी : द ग्लोबल परस्पेक्टिव्ह' आणि 'रिथिंकिंग महात्मा गांधी : द ग्लोबल अप्रायझल' हे दोन संदर्भग्रंथ साकार झाले आहेत. दोन्ही ग्रंथांत मिळून जगभरातील ६१ गांधी अभ्यासक-संशोधकांनी गांधींच्या विविध पैलूंवर लेख लिहिले आहेत.

पुढारी

# म. गांधी यांच्या मानवतावादी विचारांचे होणार पुनर्विचार मंथन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

व्हर्जिनिया (अमेरिका) येथील जेम्स मॅडिसन विद्यापीठातील दिवंगत प्रा. टेरी बेटझल व शिवाजी विद्यापीठ इंग्रजी अधिविभागातील प्रा. डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी महात्मा गांधी यांच्या जीवन व कार्याविषयी 'रिफ्लेक्शन्स ऑन महात्मा गांधी: द ग्लोबल परस्पेक्टिव्ह' व 'रिथिंकिंग महात्मा गांधी: द ग्लोबल अप्रायझल' हे दोन संदर्भ ग्रंथ संपादित केले आहेत. जागतिक मानवी समूहाच्या समस्या सोडविण्यासाठी महात्मा गांधी यांचे मानवतावादी मूल्य जोपासणाऱ्या विचारांचे या दोन पुस्तकांमधून पुनर्विचार मंथन होणार आहे.

महात्मा गांधी यांची १५० वी जयंती व आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन यांचे औचित्य साधून जेम्स मॅडिसन विद्यापीठाचे महात्मा गांधी सेंटर व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकाशन समारंभ होणार आहे. आंतरराष्ट्रीय संदर्भ ग्रंथांचे प्रकाशन शुक्रवारी (दि. १ ऑक्टोबर), महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला ऑनलाईन पद्धतीने होणार आहे.

२०१९ रोजी महात्मा गांधी यांच्यावर एक पुस्तक तयार करण्याची संकल्पना मांडली गेली. प्रा. टेरी बेटझल व प्रा. लंगरे यांनी 'इंडो-अमेरिकन बुक प्रोजेक्ट '२०१९' अंतर्गत महात्मा गांधी यांच्याविषयीच्या ग्रंथांचा प्रकल्प हाती घेतला. त्यातून दोन संदर्भ ग्रंथ साकारले आहेत. दोन्ही ग्रंथांत जगभरातील ६१ गांधी अभ्यासक, संशोधकांनी महात्मा गांधींच्या विविध पैलूंवर संशोधनपर लेख लिहिले आहेत.

जागतिक ख्यातीचे गांधी तत्त्वज्ञ व राजकीय विचारवंत, ब्रिटिश अॅकॅडमीचे सदस्य लॉर्ड भिकू पारेख यांनी प्रस्तावना लिहिली आहे. सामाजिक कार्यकर्ते, लेखक तुषार गांधी यांचा अभिप्राय लाभला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 OCT 2021
पुढारी

# शैक्षणिक वर्ष १ नोव्हेंबरपासून

## वरिष्ठ महाविद्यालये दिवाळीनंतर सुरू होणार : उदय सामंत

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

**राज्यातील वरिष्ठ महाविद्यालये दिवाळीनंतर सुरू होतील; मात्र नवे शैक्षणिक वर्ष त्याआधीच १ नोव्हेंबरपासून सुरू होईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी मुंबईत दिली. महाविद्यालये सुरू होणार असली, तरी विद्यार्थ्यांना उपस्थितीची सक्ती केली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.**

उच्चशिक्षण विभागाने घेतलेल्या अकृषी विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या बैठकीत महाविद्यालये सुरू करण्यासाठी सर्वच कुलगुरूंनी अनुकूलता दर्शवली. स्थानिकस्तरावरील प्रवेश, अभ्यासक्रमनिहाय प्रवेशांची माहिती आणि प्रत्यक्षात महाविद्यालये सुरू करण्यासाठी असलेली तयारी कुलगुरूंनी सादर केली. आता विद्यापीठे आणि महाविद्यालये सुरू करण्यासाठी टास्क फोर्सशी चर्चा करून कोरोनासंदर्भातील मार्गदर्शक सूचना तयार केल्या जातील. त्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून महाविद्यालये सुरू करण्याचा अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याचे सामंत म्हणाले.

सध्या व्यावसायिक महाविद्यालयांच्या प्रवेशाच्या सीईटी सुरू आहेत. त्यांचे निकाल आणि त्यानंतर प्रवेश यामुळे ही महाविद्यालये दिवाळीनंतरच सुरू होऊ शकतील. शैक्षणिक वर्षाचे एक कॅलेंडर गृहीत धरावे लागते. ते मात्र १ नोव्हेंबरपासून लागू होईल, असे उच्च व तंत्रशिक्षण विभागातील अधिकारी सांगतात.

### प्राचार्य, प्राध्यापक भरतीचा मार्गही मोकळा



राज्यातील महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेल्या प्राचार्य आणि प्राध्यापकांच्या भरतीसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तयार करण्यात आलेली फाईल येत्या काही दिवसांत वित्त विभागाकडे जाणार आहे. राज्यात रिक्त असलेल्या ३ हजार ७४ हून अधिक प्राध्यापकांच्या जागा भरण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी आशा आहे. प्राध्यापकांना तासिका तत्त्वावर काम करत असताना चांगले मानधन मिळायला हवे, याचाही विचार केला जात असल्याचे उदय सामंत यांनी सांगितले.

0 1 OCT 2021
तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘दूरशिक्षण’ची ‘क्यूआर कोड’वर प्रवेशपूर्व नोंदणी

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ म्हंटले की जूनमध्ये प्रवेश, ऑक्टोंबरमध्ये परीक्षा ठरलेली असते. परंतु कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रवेश प्रक्रिया किंवा परीक्षाही ठरलेल्या वेळेत झालेल्या नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना पूरक माहिती देण्यासाठी दूरशिक्षण विभागाने प्रवेशपूर्व नोंदणीसाठी क्यूआर कोड दिलेला आहे. क्यूआर कोड स्कॅनिंग केला की प्रवेश अर्ज ओपन होतो. अर्ज भरल्यानंतर विद्यार्थ्यांची प्रवेशासाठीची नावनोंदणी ‘दूरशिक्षण“कडे होते. नोंदीत विद्यार्थ्यांना मोबाईलवर ‘दूरशिक्षण“कडून रोज अपडेट मिळणार आहेत. यातून विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनाही ‘टेक्नोसॉव्ही“चा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. ‘दूरशिक्षण“च्या ८१ स्टडी सेंटरवर १३ अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या ५ हजार विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.



■ प्रवेश, परीक्षेसह अन्य अपडेट विद्यार्थ्यांना मिळणार

‘दूरशिक्षण“चा क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर विद्यार्थ्यांना सध्या प्रवेशासंदर्भात माहिती मिळणार आहे. परंतु भविष्यात ‘दूरशिक्षण“च्या विद्यार्थ्यांना घरबसल्या प्रवेश, परीक्षा अर्ज, हॉलटिकीट, ऑनलाईन लेक्चर, अभ्यासक्रमाच्या व्हिडीओ, ऑडिओ क्लिपदेखील ईमेल, व्हॉटसॲप तून उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे ‘दूरशिक्षण“च्या ८१ स्टडी सेंटरवर १३ अभ्यासक्रमाच्या घेणाऱ्या ५ हजार विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

सध्या ‘दूरशिक्षण“चे स्टडी मटेरियल ऑनलाईन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. अभ्यासक्रमाचे ऑडिओ, व्हिडीओ तयार करून विद्यार्थ्यांना पाठवले जाणार आहेत. त्यासाठी ‘दूरशिक्षण“तील प्राध्यापकांना तंत्रज्ञान साक्षरतेचे प्रशिक्षण दिले आहे. त्यातून विषयावर प्रभुत्व असलेल्या प्राध्यापकांना आधुनिक तंत्रज्ञान कसे हाताळायचे, याची माहिती दिली आहे. परिणामी, प्राध्यापकांना विद्यार्थ्यांना ऑनलाईन अध्यापन सोपे झाले आहे. त्यामुळे एकूणच दूरशिक्षण केंद्राची क्यूआर कोड सिस्टीम विद्यार्थ्यांसाठी आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या सोयीस्कर ठरणार आहे.

**नावनोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना निश्चित प्रवेश मिळणार**

कोरोनाच्या कालावधीत ‘युजीसा“च्या नियमात सतत बदल होत आहेत. क्यूआर कोड आणि टेलिग्राममुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे. विद्यार्थ्यांनी हा अर्ज भरल्यानंतर त्यांचा प्रवेश निश्चित होणार आहे. ‘दूरशिक्षण“चे पहिले सत्र नोव्हेंबरमध्ये सुरू होणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास विद्यापीठाला मदत होईल. शिक्षणापासून वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे यामुळे शक्य झाले आहे.

**डॉ. एम. एम. सरवदे (प्रभारी संचालक, दूरशिक्षण केंद्र)**

**टेलिग्राम ग्रुपचाही विद्यार्थ्यांना फायदा**

‘दूरशिक्षण“च्या प्रवेशापासून परीक्षेसंदर्भातील माहितीसाठी टेलीग्राम ग्रुपही तयार केला आहे. या ग्रुपवर ५८३ विद्यार्थी जॉईन आहेत. त्यांना रोज अपडेट दिली जात आहे. क्यूआर कोड १०३० विद्यार्थ्यांनी स्कॅन केला आहे. त्यामुळे ‘दूरशिक्षण“ची प्रवेशपूर्व ऑनलाईन नावनोंदणी यशस्वी होण्याच्या मार्गावर आहे.